पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता

**पुणे महानगरपालिका**
**सभेचा वृत्तांत ( सभा क्रमांक १२ )**
**मंगळवार, दिनांक १०/५/२०२२, दुपारी ३.३० वाजता**

**पुणे महानगरपालिकेची मासिक (स्थगित) सभा (माहे जानेवारी २०२२ च्या कार्यपत्रिकेवरील कामकाजासाठी प्रथम दिनांक २०/१/२०२२ रोजी बोलविलेली) महानगरपालिकेच्या मा.महापालिका आयुक्त कार्यालयातील सभागृहात भरली होती.**

**सदर सभेस खालील मा.अधिकारी उपस्थित होते.**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मा. विक्रम कुमार,भा.प्र.से. | – | प्रशासक तथा महापालिका आयुक्त |
| २) | मा. राजेंद्र मुठे | – | उपायुक्त (दक्षता व मालमत्ता व्यवस्थापन) |
| ३) | मा. श्रीनिवास कंदुल | – | मुख्य अभियंता (विद्युत) |
| ४) | श्री. शिवाजी दौंडकर | – | नगरसचिव |

**मा. विक्रम कुमार, भा.प्र.से, महापालिका आयुक्त तथा प्रशासक, पुणे मनपा हे सभापती म्हणून अध्यक्षस्थानी होते.**

**मा. प्रशासक :** सभा सुरु करावी.

**नगरसचिव :** माहे जानेवारी २०२२ कार्यपत्रिका. मा.सभापती/प्रशासक यांनी विषय घेण्याचे आदेश दिले आहेत.

**विषय क्र. ७१५**

बालेवाडी स.नं.२०,२१ बाणेर स.नं.१०९ येथे उभारण्यात आलेल्या डेडीकेटेड कोव्हिड हॉस्पीटल ( डि.सी.एच ) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३)(क) अन्वये डॉ.भिसे मल्टिस्पेशालिटी हॉस्पीटल यांना ३ महिने कालावधीकरीता मुदतवाढ देवून चालविण्यास देणेस, त्यांचे बिल अदा करणेस व वाढीव करारनामा करणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र./मआ/आरोग्य/१०११, दि.२०/१२/२०२१ चे पत्र

**ठराव क्रमांक :– २१**

**संदर्भ–** **१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/१०११दि. २०/१२/२०२१ चे पत्र.**
**२) स्थायी समिती ठराव क्र.१७७९,दि.२१/१२/२०२१**

-----

**मा.महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –**

**बालेवाडी स.नं.२०,२१ बाणेर स.नं.१०९ येथे उभारण्यात आलेल्या डेडीकेटेड कोव्हिड हॉस्पीटल (डि.सी.एच) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३)(क) अन्वये डॉ.भिसे मल्टिस्पेशालिटी हॉस्पीटल यांना ३ महिने कालावधीकरीता मुदतवाढ देवून चालविण्यास देणेस, त्यांचे बिल अदा करणेस व वाढीव करारनामा करणेस अवलोकनार्थ सादर करणेत येत असल्याची नोंद घेण्यात येत आहे.**

**निर्णय :– विषय क्र. ७१५ संमत झाल्याचे मा.सभापती/प्रशासक यांनी प्रकट केले.**

**विषय क्र. ७१६**

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय शिवाजीनगर, पुणे ५ येथील जम्बो कोव्हिड हॉस्पीटलला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) (क) अन्वये मुदतवाढ देणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१०१२, दिनांक २०/१२/२०२१ रोजीचे पत्र.

ठराव क्रमांक :– २२

संदर्भ– १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/१०१२दि. २०/१२/२०२१ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र.१७८०,दि.२१/१२/२०२१

-----

मा.महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय शिवाजीनगर, पुणे५ येथील जम्बो कोव्हिड हॉस्पीटलला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३)(क) अन्वये मुदतवाढ देणेसाठी खालील बाबींस मान्यता देण्यात येत आहे.

१) COEP जम्बो कोविड हॉस्पीटल पुणे महानगरपालिकेमार्फत ऑक्टोबर २०२१,नोव्हेंबर २०२१ व डिसेंबर २०२१ या तीन महिन्याचे कालावधीकरिता चालविण्यास देणेस.

२) COEP जम्बो कोविड हॉस्पीटल चालविणेकरीता पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेमार्फत निश्चित केलेल्या दरानुसार व अटी शर्तीनुसार यापूर्वी काम करणाऱ्या संस्थांची नेमणूक करणेस ( १.मेडब्रोज हेल्थकेअर प्रा.लि. २.दिपाली डिझाईन्स अॅन्ड एक्जिबिटस प्रा.लि.३.जेएसके मेडिकल सिस्टिम ) तसेच आवश्यकता भासल्यास अधिकच्या अटी शर्ती व इतर कामकाजाच्या दरांमध्ये मा.महापालिका आयुक्त यांची पूर्व मान्यता घेऊन अतिरिक्त फेरबदल करणेस.

३) उपरोक्त प्रमाणेच्या अटी व शर्तीनुसार होणारा खर्च खालील अर्थशिर्षकामधून खर्च करणेस व आवश्यकता भासल्यास वर्गीकरणाद्वारे रक्कम उपलब्ध करून घेणेस.

अर्थशिर्षक सन २०२१–२२
RE17F259
कोव्हिड १९ अंतर्गत जम्बो हॉस्पिटलसाठी खर्च.
मान्य तरतूद रक्कम रूपये ७५,००,००,०००/–

निर्णय :– विषय क्र. ७१६ संमत झाल्याचे मा.सभापती/प्रशासक यांनी प्रकट केले.

विषय क्र. ७१७

वडगावशेरी मतदार संघातील राजीव गांधी रूग्णालय,येरवडा येथे ऑक्सिजन प्लांट निर्मिती करणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३)(क) अन्वये मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भवन/१०४३, दिनांक २१/१२/२०२१ रोजीचे पत्र.

ठराव क्रमांक :– २३

संदर्भ– १) मा.महापालिका आयुक्त, पुणे मनपा यांची मान्यता ठ.क्र.६/१८९,दि.१०/६/२०२१
२) शासन निर्णय महसूल व वन विभाग सीएलएस–२०२०/प्र.क्र.१२३/म–३,दि.१६/३/२०२०
३) शासन परिपत्रक वित्त विभाग संकीर्ण–२०२०/प्र.क्र.५९/२०/कोषा.प्रशा–५,दि.१८/३/२०२०
४) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/भवन/१०४३दि. २१/१२/२०२१ चे पत्र.
५) स्थायी समिती ठराव क्र.१७८१,दि.२१/१२/२०२१

-----

मा.महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

वडगावशेरी मतदार संघातील राजीव गांधी रूग्णालय,येरवडा येथे ऑक्सिजन प्लांट निर्मिती करणे हे काम अतितातडीची बाब म्हणून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)क अन्वये करणेत येत असलेल्या कामांच्या खालील बाबीं अवलोकनार्थ सादर करणेत येत असल्याची नोंद घेण्यात येत आहे.

१) वडगावशेरी मतदार संघातील राजीव गांधी रूग्णालय, येरवडा येथे ऑक्सिजन प्लांट निर्मिती करणे हे काम ठेकेदार मे.यशराज ग्लोबल इन्फ्राकॉन एलएलपी यांचेकडून पुर्वगणित टेंडर रकमेच्या (जीएसटी,रॉयल्टी व टेस्टिंग चार्जेस वगळून येणारी रक्कम ) ५% कमी दराने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)क अन्वये करून घेणेची,त्यासाठी त्यांना वर्क ऑर्डर देऊन त्यांचेशी करारनामा करून घेणेची व ठेकेदारास त्यांनी प्रत्यक्ष केलेल्या कामानुसार तथापि ५% कमी दराने अधिक जीएसटी, रॉयल्टी व टेस्टिंग चार्जेस नुसार येणाऱ्या एकूण र.रू.५५,८२,०००/– ( र.रू.पंचावन्न लक्ष ब्याऐंशी हजार फक्त ) रकमेपर्यंत बिल आदा करणेची बाब.

२) या कामांचा खर्च र.रू.२५ लक्ष पेक्षा जास्त असल्याने पुणे मनपाच्या प्रचलित धोरणानुसार वरील ठेकेदारानी प्रत्यक्ष केलेल्या कामानुसार विशेष भाववाढ सूत्रानुसार (star rate) येणार रक्कम त्यांना अदा अथवा वसूल करण्याची बाब.

निर्णय :– विषय क्र. ७१७ संमत झाल्याचे मा.सभापती/प्रशासक यांनी प्रकट केले.

**विषय क्र. ७२१**

पुणे महानगरपालिकेकडून ओपन ॲक्सेसद्वारे वीज खरेदी करण्याबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र./मआ/विद्युत/ १०४० दिनांक २१/१२/२०२१ रोजीचे पत्र.

**मा.प्रशासक :** सदरचा विषय रद्द करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक :– २४**

**संदर्भ–** **१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/विद्युत/१०४० दि. २१/१२/२०२१ चे पत्र.**
**२) स्थायी समिती ठराव क्र.१८०९,दि.२८/१२/२०२१**

**विषय–** **पुणे महानगरपालिकेकडून ओपन ॲक्सेसद्वारे वीज खरेदी करण्यासाठी ईईएसएल(EESL) ची उपकंपनी असलेल्या सीईएसएल (CESL)या शासकीय संस्थेबरोबर Power Purchase Agreement (PPA)करण्यास ज्यामध्ये २० वर्षापर्यंत र.रू. ३.४० / kwh या दराने वीज खरेदी करण्यास तसेचओपन ॲक्सेसद्वारे वीज खरेदी करण्यासाठी ईईएसएल(EESL) ची उपकंपनी असलेल्या सीईएसएल (CESL)या शासकीय संस्थेसोबत एसपीव्ही (SPV)स्थापित करणेस व(SPV)मधील सदस्य नियुक्तीचे अधिकार महापालिका आयुक्त यांना देणेबाबत.**

-----

**विषय क्र. ७२१ रद्द करण्यात येत आहे.**

**निर्णय :– विषय क्र. ७२१ रद्द करण्यात आल्याचे मा.सभापती/प्रशासक यांनी प्रकट केले.**

**विषय क्र. ७५८**

कोरोना प्रतिबंधात्मक योजने अंतर्गत पुणे महानगरपालिकेच्या दळवी हॉस्पिटल, शिवाजीनगर, पुणे येथील स्थापत्य विषयक कामांबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३)(क) अन्वये मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र./मआ/भवन/११५३, दिनांक ०४/०१/२०२२ रोजीचे पत्र.

**ठराव क्रमांक :– २५**

**संदर्भ :–** **१) मा. महापालिका आयुक्त, पुणे मनपा यांची मान्यता ठ.क्र. ६/३५६, दि.११.०८.२१**
**२) शासन निर्णय महसूल व वन विभाग सीएलएस –२०२०/प्र.क्र.१२३/म–३, दि.१६.३.२०२०**
**३)शासन परिपत्रक वित्त विभाग संकीर्ण–२०२०/प्र.क्र.५९/२०/ कोषा. प्रशा–५, दि. १८.३.२०२०**
**४)मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/भवन/११५३ दि. ४/१/२०२२ चे पत्र.**
**५) मा.स्थायी समिती ठराव क्र.१९१९,दि.४/१/२०२२**

-----

**मा.महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –**

**कोरोना प्रतिबंधात्मक योजने अंतर्गत पुणे महानगरपालिकेच्या दळवी हॉस्पिटल, शिवाजीनगर, पुणे येथे वरील निवेदनात नमूद स्थापत्य विषयक कामे ठेकेदार मे.जयशंकर एन्टरप्रायजेस, पुणे यांचेकडून पूर्वगणित टेंडर रकमेच्या ( जीएसटी, रॉयल्टी व टेस्टिंग चार्जेस वगळून येणारी रक्कम ) ॲटपार दराने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ क अन्वये करून घेणेची, त्यासाठी त्यांना वर्कऑर्डर देऊन त्यांचेशी करारनामा करून घेणेची व ठेकेदारास त्यांनी प्रत्यक्ष केलेल्या कामानुसार ॲटपार दराने अधिक जीएसटी, रॉयल्टी व टेस्टिंग चार्जेस नुसार येणाऱ्या एकूणर.रू. ९,३१,९८८=९६/– रकमेपर्यंत बिल आदाकरणेची बाब मा. मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर केल्याची नोंद घेण्यात येत आहे.**

**निर्णय :– विषय क्र. ७५८ संमत झाल्याचे मा.सभापती/प्रशासक यांनी प्रकट केले.**

**विषय क्र. ७६१**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ९५ नुसार महानगरपालिकेचे महसूली, भांडवली इ. उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रक आराखडा ( अ व क ) अंदाजपत्रकाबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र./मआ/मुले/११६४ दि.०७ /०१/२०२२ चे पत्र.

**ठराव क्रमांक :– २६**

**संदर्भ :–** **१)मा. म.न.पा. सभा ठराव क्रमांक ३४९ दि. ४/१०/१९८३**
**२) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/११६४, दि. ७/१/२०२२ चे पत्र.**

३) मा.स्थायी समिती ठराव क्र.१९७८,दि.११/१/२०२२

-----

मा. महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन–

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ९५ नुसार महानगरपालिकेचे महसूली, भांडवली इ. उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रक आराखडा ( अ व क ) अंदाजपत्रक दिनांक १५ जानेवारी अगर तत्पूर्वी संदर्भांकित ठरावानुसार मा. स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. तथापि पुणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक कामकाजामुळे सन २०२२–२३ चे अंदाजपत्रक आराखडा दिनांक २२ फेब्रुवारी २०२२ रोजी सकाळी ११.३० वा. सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

निर्णय :– विषय क्र. ७६१ संमत झाल्याचे मा.सभापती/प्रशासक यांनी प्रकट केले.

विषय क्र. ७६२

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय शिवाजीनगर पुणे.५ येथील जम्बो कोव्हिड हॉस्पीटलबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३)(क) अन्वये मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र./मआ/आरोग्य/११६५ दि.०७ /१/२०२२ चे पत्र.

ठराव क्रमांक :– २७

संदर्भ :– १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/११६५,दि.७/१/२०२२ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१९७९,दि.११/१/२०२२

-----

मा. महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन–

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय शिवाजीनगर पुणे.५ येथील जम्बो कोव्हिड हॉस्पीटलला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३) (क)अन्वये खालील तीन बाबींस मान्यता देण्यात येत आहे.

१) COEP जम्बो कोविड हॉस्पीटल पुणे महानगरपालिके मार्फत जानेवारी २०२२,फेब्रुवारी २०२२, मार्च २०२२ या तीन महिन्याचे कालावधीकरिता चालविण्यास.

२) COEP जम्बो कोविड हॉस्पीटल चालविणेकरीता पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेमार्फत निश्चित केलेल्या दरानुसार व अटी शर्तीनुसार यापूर्वी काम करणाऱ्या संस्थांची नेमणूक करणेस.(१.मेडब्रीज हेल्थकेअर प्रा.लि. २.दिपाली डिझाईन्स अॅन्ड एक्जिबिटस प्रा.लि. ३.जेएसके मेडिकल सिस्टिम ) तसेच आवश्यकता भासल्यास अधिकच्या अटी शर्ती व इतर कामकाजाच्या दरांमध्ये मा.महापालिका आयुक्त यांची पूर्व मान्यता घेऊन अतिरिक्त फेरबदल करणेस.

३) उपरोक्त प्रमाणेच्या अटी व शर्तीनुसार होणारा खर्च खालील अर्थशिर्षकामधून खर्च करणेस व आवश्यकता भासल्यास वर्गीकरणाद्वारे रक्कम उपलब्ध करून घेणेस.

अर्थशिर्षक सन २०२१ – २२

RE17F259

कोव्हिड १९ अंतर्गत जम्बो हॉस्पीटलसाठी खर्च, मान्य तरतूद रक्कम रू.७५,००,००,०००/–

निर्णय :– विषय क्र. ७१५ संमत झाल्याचे मा.सभापती/प्रशासक यांनी प्रकट केले.

विषय क्र. ७७४

पुणे शहरातील नदीमधील जलपर्णी स्पायडर मशिनच्या साहाय्याने काढणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३)(क) अन्वये मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र./मआ/मलनि/१२१४ दि.११/०१/२०२२ चे पत्र

ठराव क्रमांक :– २८

संदर्भ :– १) मा.महापालिका आयुक्त जा.क्र.आ/अतिमआ (ज)/माप्रावि/आस्था/९११५,दि.१६/३/२०२१ रोजीचे आदेश
२) मा. मुख्य लेखा व वित्त विभाग यांचेकडील जा.क्र. १९५, दि. २२/४/२०२१ रोजीचे पत्र.
३) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मलनिः/१२१४ दि. ११/१/२०२२ चे पत्र.
४) मा.स्थायी समिती ठराव क्र.२०१२,दि.१८/१/२०२२

---

मा. महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन–

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) (क) मधील तरतुदीच्या अनुषंगाने पुणे शहरातील नदीमधील जलपर्णी स्पायडर मशिनच्या साहाय्याने काढणे कामी मे. अंकिता इंजिनिअर्स यांनी केलेल्या कामास व त्यापोटीदेयक अदा करणेसाठी खालील बाबींस मान्यता देण्यात येत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) (क) मधील तरतुदीनुसार मे.अंकिता इंजिनिअर्स यांनी केलेल्या कामास पश्चात मान्यता व देय रक्कम रू. ३८,८०,७२१=६२ अदा करणेस,

सन २०२१–२२, **RE21C144,**

**पुणे शहरातील मुळा, मुठा नदीमधील जलपर्णी यांत्रिकी पद्धतीने Out Sourcing तत्वावर काढणे मान्य रक्कम रू. १,००,००,०००/–**

निर्णय :– विषय क्र. ७७४ संमत झाल्याचे मा.सभापती/प्रशासक यांनी प्रकट केले.

**विषय क्र. ७८१**

वानवडी – रामटेकडी क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत स्वच्छता व पडीक हद्दीचे झाडणकामासाठी कंत्राटी सेवक नेमणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३)(क) अन्वये मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र./मआ/प.क्र.४/१२४९ यांचे दिनांक १८/०१/२०२२ रोजीचे पत्र.

**ठराव क्रमांक :– २९**

**संदर्भ–**
**१) सन २०२१–२२ चे अंदाजपत्रकातील प्राप्त तरतूद .**
**२) मे. एल.व्ही.जी. फॅसिलिटी इंडिया प्रायवेट लिमिटेड यांचे आ.क्र. ५०६९ दि.२६/१०/२०२१ रोजीचे पत्र.**
**३) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/प.क्र.४/१२४९ यांचे दि. १८/१/२०२२ चे पत्र.**
**४) मा.स्थायी समिती ठराव क्र.२०२०,दि.१८/१/२०२२.**

---

**मा.महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –**

**वानवडी – रामटेकडी क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत स्वच्छता व पडीक हद्दीचे झाडणकामासाठी कंत्राटी सेवक नेमणे साठी मे. एल.व्ही.जी. फॅसिलिटी इंडिया प्रायवेट लिमिटेड यांची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६७ (३) क अन्वये काम करून घेणेसाठी खालील बाबीस मान्यता देण्यात येत आहे.**

**१. मे. एल.व्ही.जी. फॅसिलिटी इंडिया प्रायवेट लिमिटेड यांचेकडून विनाकरारनामा काम करून घेणेस**

**२. मे. एल.व्ही.जी. फॅसिलिटी इंडिया प्रायवेट लिमिटेड यांचेकडून दिनांक माहे १६ जून २०२१ ते दिनांक ३१ ऑक्टोबर २०२१ पर्यंत करण्यात येणाऱ्या कामाचे बिल रक्कम रूपये २,५९,१६,३१९/– इतकी अनामत रक्कम वजावट न करता अदा करणेस.**

**३. मे. एल.व्ही.जी. फॅसिलिटी इंडिया प्रायवेट लिमिटेड यांचेकडून सदर काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६७ (३) क अन्वये कामकाज करून घेणेस केलेल्या कामास कार्यात्तर मान्यता मिळणेस.**

**४. तसेच वानवडी–रामटेकडी क्षेत्रिय कार्यालय निविदा प्रक्रीया पूर्ण होवून कार्यादेश होई पर्यंत मे. एल.व्ही.जी. फॅसिलिटी इंडिया प्रायवेट लिमिटेड यांचेकडून त्यांचे प्राप्त झालेल्या दरानुसार काम करणेस.**

निर्णय :– विषय क्र. ७८१ संमत झाल्याचे मा.सभापती/प्रशासक यांनी प्रकट केले.

मा.सभापती/प्रशासक : आजची सभा गुरुवार, दिनांक १९/५/२०२२ रोजी, सकाळी ११.०५ वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

वरीलप्रमाणे कामकाज होऊन सभा तहकुब झाल्याचे मा.सभापती/प्रशासक यांनी जाहीर केले.

स्वाक्षरी /–xxx
शिवाजी दौंडकर,
नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

*******

दि. १९–०८–२०२२ च्या सभेत वृत्तांत कायम केला.

स्वाक्षरी /–xxx

प्रशासक, पुणे म.न.पा.

**********